# महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेड (MITL)

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**दिनांक: १० सप्टेंबर २०२६**

## <u>सूचना</u>

**विषय: प्रकल्पग्रस्तांसाठी (PAP) ऑनलाईन भूखंड पसंतीक्रम (Plot Preference) नोंदविण्याबाबत अत्यंत महत्त्वाची सूचना.**

महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेड (**MITL**) मार्फत प्रकल्पग्रस्त व्यक्तींना भूखंड वाटप धोरण २०२१ मधील तरतुदींनुसार ऑनलाईन प्रणालीद्वारे भूखंड निवडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

प्रकल्पग्रस्तांची मोठ्या प्रमाणातील संख्या आणि प्राप्त अर्जांचा विचार करता, भूखंड वाटप प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि टप्प्याटप्प्याने पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक व नियोजन निश्चित करण्यात आले आहे:

1. पहिला टप्पा (११ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२६): पहिल्या टप्प्यामध्ये ५००० चौ. मी. पेक्षा जास्त पात्र क्षेत्र (**Eligible Area**) असलेल्या किंवा त्यास अनुज्ञेय जवळच्या आकाराचे भूखंड असलेल्या प्रकल्पग्रस्त (**PAP**) अर्जदारांसाठी ऑनलाईन पोर्टलवर भूखंड नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. पात्र अर्जदारांनी आपल्या **AURIC ID** चा वापर करून पोर्टलवर लॉगिन करावे व ११ सप्टेंबर २०२६ ते १७ सप्टेंबर २०२६ या ७ दिवसांच्या कालावधीत प्रथम, द्वितीय, तृतीय इत्यादी अनुक्रमाने आपला भूखंड पसंतीक्रम नोंदवावा.
2. पुढील टप्पे (इतर क्षेत्रफळधारकांसाठी): ५००० चौ. मी. पेक्षा कमी पात्र क्षेत्र असलेल्या उर्वरित प्रकल्पग्रस्त अर्जदारांसाठी भूखंड निवडीची सुविधा पुढील टप्प्यात (**Phase-wise**) उपलब्ध करून दिली जाईल. या संदर्भातील पुढील टप्प्याचे वेळापत्रक व पोर्टल लिंक संबंधित अर्जदारांना पोर्टल सुरू होण्याच्या आधी **SMS** व फोन वरती कळविण्यात येईल.

महत्त्वाच्या बाबी: पोर्टल कालावधी: भूखंड पसंतीक्रम नोंदवण्याची ही सुविधा पोर्टल उपलब्ध झाल्यापासून ७ दिवस राहील. त्यानंतर संबंधित सायकलसाठी पोर्टल बंद होईल. जर दिलेल्या मुदतीत (७ दिवसांत) पसंतीक्रम नोंदवला नाही, तर अशा अर्जदारांना पुढील भूखंड पसंती सायकलमध्ये संधी देण्यात येईल. जर एकाच भूखंडासाठी एकापेक्षा जास्त प्रकल्पग्रस्तांनी पसंती दर्शवली, तर धोरणानुसार लॉटरी पद्धतीद्वारे भूखंडाचे वाटप केले जाईल.

अधिकृत संकेतस्थळ: **www.auric.city -> Apply for Land-> Lottery Portal**

**Lottery Portal link:** [https://pap.auric.city/](https://pap.auric.city/)

तांत्रिक सहाय्यासाठी संपर्क:

1. Sayali Karande- मोबाईल क्र.: **9702948292**

**टिपणी- PAP Lottery Portal साठी आवश्यक Login Credentials (User ID व Password) संबंधित PAP धारकांना उपलब्ध करून देण्यात येतील. Credentials प्राप्त झाल्यानंतर संबंधित PAP धारकांनी प्रथम त्यांचा Password बदलणे आवश्यक राहील. त्यानंतर PAP धारकांनी Portal वर Login करून आपला संबंधित भूखंड निवडून Submit करणे बंधनकारक राहील.**

*****"**एकदा भूखंडाचे वाटप निश्चित झाल्यानंतर तो कोणत्याही कारणास्तव बदलून दिला जाणार नाही."**

सर्व संबंधित PAP धारकांनी वरील सूचनेची नोंद घेऊन विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही करावी.

SD,
MITL